# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक १२.०७.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ११.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये ०६ ईसमांवर कारवाई करून ३,२२४/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये १० ईसमावर कारवाई करुन २४,३४०/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,७७१ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,९२,०००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथक पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक १२.०७.२०२६ चे ०२.३० वा. ते ०५.१० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना पेट्रोलींग दरम्यान पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीत, दहीबाजार, दलाल चौक, शेख वसीमचे घरासमोर असलेले बंदीस्त टिनाचे शेड मध्ये एका बर्गमॅन गाडीवरील एका इसमास गाडीचे पायदानवर एक पोते नेतांना दिसल्याने, त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन पंचासमक्ष रेड कारवाई केली. गाडीवरील इसमास ताब्यात घेऊन त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव शेख जावेद शेख मुन्ना राईन वय ३५ वर्ष रा. ताजशेठ बिल्डींगजवळ, बिच का पुलियाजवळ, दहीबाजार, नागपूर असे सांगितले. तसेच शेडमध्ये असलेला दुसरा इसम यास त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव मोहम्मद हारुन रशीद पिंजारी वय ३९ वर्ष रा. स्टार मेडीकोज समोर, दलालचौक, शांतिनगर, नागपूर असे सांगितले. बर्गमॅन चालकाजवळील पोत्याची पाहणी केली असता, त्यामध्ये हिरव्या रंगाचा पाना—फुलांचा व उग्र वास येणारा अंमली पदार्थ गांजा मिळून आला. टिनाचे शेडची पाहणी केली असता, चार प्लास्टीकचे पोते मिळून आले. पाहणी केली असता, त्यामध्ये सुदधा हिरव्या रंगाचा पाना—फुलांचा व उग्र वास येणारा अंमली पदार्थ गांजा मिळून आला. आरोपीचे ताब्यातुन एकूण ५४ किलो ९९८ ग्राम गांजा, ०३ मोबाईल फोन, वजन काटे, गांजाविक्रीचे रोख १,३५,५७०/— रुपये व विना नंबरची बर्गमॅन मोपेड असा एकुण १६,५१,५२०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, त्यांनी त्यांचा साथीदार पाहिजे आरोपी विक्की नावाचा इसम वय ३५ वर्ष रा. ओडीसा याने गांजा विक्रीकरीता आणुन दिल्याचे सांगीतले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii)(क),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे

शांतीनगर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह शांतीनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (अती. कार्य. गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षीरसागर, सपोनि संदीप जाधव, पोहवा ज्ञानेश्वर भोगे, शेख इमरान, रत्नाकर कोठे, विवेक आढाव, पोअ संतोष शेंद्रे, धनराज मसराम, शेषराव रेवतकर, राहुल पाटील व मपोहवा अनुप यादव यांनी केली




**३) गुन्हेशाखा युनिट क्र. १ पोलीसांची कामगिरी :— चोरी व वाहनचोरी असे ०२ गुन्हे उघडकीस.**

दिनांक ०३.०६.२०२६ चे ०३.०० वा. ते ०४.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे अजनी हद्दीत, प्लॉट नं. ७१, रामेश्वररी, अजनी, नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती रेखा संजय तायडे वय ५० वर्षे यांचे मुलाने राहते घराचे मुख्य दाराला कडी न लावता, दार टेकवून झोपला असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे दार ढकलून, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी कपाटातुन रोख २०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण १,५१,०००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. १ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व गोपनीय माहितीवरून आरोपी नामे १) हर्ष उर्फ एक्का महेंद्र रामटेके वय २६ वर्षे, रा. गौतम बुध्द वार्ड, तिरोडा जि. गोंदीया २) अर्जुन प्रभु सोलंकी वय २७ वर्ष रा. आराधना नगर, बिडगाव, भांडेवाडी, नागपूर यांना ताब्यात घेवुन विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद चोरीचा गुन्हा संगणमताने केल्याची कबुली दिली. तसेच चोरीचा मुद्देमाल आरोपी क्र. ३) संदीप भास्करराव गुंफलवार रा. उमरेड याला दिल्याचे सांगितले. आरोपींचे ताब्यातुन २७ ग्रॅम सोन्याची लगड व रोख १६,०००/— रुपये तसेच गुन्हा करतांना वापरलेले चारचाकी शेवरलेट क्रुज वाहन कि. २,००,०००/— रु. चे असा मुद्येमाल जप्त करण्यात आला. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, त्यांनी पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीतून दिनांक २४.०४.२०२६ रोजी पॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच ४० बीयू ३२७० चोरी केल्याची कबुली दिली. त्यांचे ताब्यातून गुन्हयातील वाहन कि. २०,०००/— चे व गुन्हा करतांना वापरलेले केटीएम आरएस २०० कंपनीचे दुचाकी वाहन कि. १,००,०००/—रू. चे असा मुद्येमाल जप्त करण्यात आला. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव अजनी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (अती. कार्य. गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. प्रशांत ठवरे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.




**<u>४) परिमंडळ क्र. ०४ चे हद्दीतुन एकुण ९९ कुख्यात गुन्हेगार हद्दपार :–</u>**

नागपूर शहरातील हजरत बाबा ताजुद्दीन यांचे उर्स उत्सवाचे अनुषंगाने संबंधाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणेकामी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपूर शहर अंतर्गत पोलीस ठाणे हद्दीतील शरीराविरूध्द, मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारे तसेच अवैध दारू विक्री करणारे एकुण ९९ आरोपींना त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होण्याची दाट शक्यता असल्याने पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपूर शहर यांचेकडून त्यांना प्राप्त विशेष कार्यकारी दंडाधिकारी पदाच्या अधिकारांन्वये कलम १६३(२) भा.ना.सु.सं. अन्वये **दिनांक ०६.०७.२०२६ ते २०.०७.२०२६ पर्यंत १५ दिवसांचे कालावधीकरीता** त्यांना नागपूर शहराचे हद्दीत राहण्यास परावृत्त करण्यात आले आहे. आरोपींमध्ये पोलीस ठाणे अजनी–१८, हुडकेश्वर–१६, बेलतरोडी–१२, सक्करदरा–२९, नंदनवन–१२ व इमामवाडा–१२ असे एकूण ९९ आरोपींचा समावेश असून त्यांना नमुद कालावधीचे दरम्यान नागपुर शहराचे कार्यक्षेत्रात प्रवेश न करण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे. गुन्हेगारांनी तडीपार आदेशाचा भंग करुन सार्वजनिक शांततेला बाधा आणणारी कोणतीही कृति केल्यास किंवा नागपूर शहरात प्रवेश केल्यास त्यांचेविरुध्द कठोर कारवाई करण्यात येईल.

**<u>५) कुख्यात गुंड हद्दपार :–</u>**

पोलीस ठाणे तहसील हददीत **गोळीबार चौक, परमात्मा बॅक मागे, तहसील नागपूर येथे राहणारा गुन्हेगार ईसम नामे सक्षम उर्फ मधुर प्रेमनाथ मौंदेकर वय २५ वर्षे** याचेविरूध्द पोलीस ठाणे तहसील, पाचपावली येथे गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता तहसील पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०३, नागपुर शहर याचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०३, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. २३/२०२६ दिनांक ११.०६.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून ०१ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला. नमुद गुन्हेगाराचे हद्दपार आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली असुन, तहसील पोलीसांनी नमुद हद्दपार इसमास दिनांक १०.०७.२०२६ रोजी त्याचे नातेवाईक यांचेकडे हिंगणघाट जि. वर्धा येथे सोडलेले आहे.

**<u>६) गणेशपेठ पोलीसांची कामगीरी :– वाहन चोरी करणाऱ्या आरोपींना अटक.०२ गुन्हे उघडकीस.</u>**

दिनांक ०३.०७.२०२६ चे ००.१५ वा. ते ०७.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी सार्थक सुदर्शन चौरसिया वय ३० वर्षे रा. सरस्वती भवन, विजय टॉकीज समोर, घाट रोड, नागपूर यांनी त्यांची लाल रंगाची बजाज

डिस्कव्हर गाडी क्र. एम.एच. ४९ झेड १८२६ किंमती अंदाजे २,०००/—रू. ची व सुझुकी समुराई क्र. एमपी २० पी ६२४४ कि. १५,०००/— ची राहते घरासमोर अंगणात लॉक करुन ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची दोन्ही वाहने चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे तपासात गणेशपेठ पोलीसांना पेट्रोलींग दरम्यान, शेतकरी भवन मागे, बसस्थानकासमोर, एक इसम झिगझॅग पध्दतीने सुझुकी समुराई गाडी चालवित असतांना मिळून आल्याने, त्यास ताब्यात घेऊन नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव आमिर बशिर शेख वय ३६ वर्षे, रा. प्लॉट क्र. ५७, मिनी मातानगर, झिंगाबाई टाकळी, नागपूर असे सांगितले. त्याचे जवळील गाडीचे कागदपत्रांबाबत विचारणा केली असता, त्याने नमुद वाहन त्याचा साथीदार आरोपी क्र. २) अजिज अयुब खान वय १९ वर्षे रा. ईदगाह मैदानासमोर, जाफरनगर, नागपूर याचेसोबत संगणमत करून चोरी केल्याची कबुली दिली व गुन्हयातील दुसरी गाडी बजाज डिस्कव्हर त्याचेजवळ असल्याचे सांगितले. त्यालासुदधा त्याचे राहते घरुन ताब्यात घेतले. त्यास दुसरी लाल रंगाची बजाज डिस्कव्हर गाडीबाबत विचारले असता, त्याने त्याचा साथीदार आकीब शकील शेख वय २१ वर्ष रा. कस्तुरबा मस्जिदजवळ, गिट्टीखदान, नागपूर याचेकडे असल्याचे सांगितले. त्यालासुध्दा त्याचेजवळील ॲक्टिवा गाडी क्र. एमएच ४० झेड ५६०५ सह ताब्यात घेतले. गाडीबाबत विचारले असता, त्याने ॲक्टिवा गाडी पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीतुन चोरी केल्याचे सांगितले. तिन्ही आरोपींना अटक करुन त्यांचे ताब्यातुन गुन्हयातील दोन मोटारसायकली व एक ॲक्टिवा मोपेड असा एकूण ३७,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ३), मा. श्री. राजेश तटकरे, सहा. पोलीस आयुक्त (कोतवाली विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. अतुल तवाडे, पोउपनि विजेंद्र नाचण, सफौ. समिर शेख, पोअं. पवन मालखेडे, वैभव यादव, प्रतिक इटनकर व सागर धवन यांनी केली.




**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे सदर :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता वाहतुक करणाऱ्या आरोपींना अटक</u>**

दिनांक १२.०७.२०२६ चे ०५.३० वा. चे सुमारास, सदर पोलीसांनी मिळालेल्या माहीतीवरून सापळा रचुन पोलीस ठाणे सदर हद्दीत, पराठा चौक, रेसिडेन्सी रोड, सदर येथे एका टाटा सुपर एक्स चारचाकी क्र. एमएच १४ डीएम ९४२३ वाहनास थांबवून वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता, त्यामध्ये ०७ जिवंत गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या, निदर्यतेने चारा—पाणी न देता बांधुन ठेवल्याचे दिसुन आले. वाहन चालकास त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव १) मोहम्मद फैजान कुरेशी वल्द एजाज अख्तर कुरेशी वय ३६ वर्षे, रा. गड्डीगोदाम मस्जिदजवळ, सदर, नागपूर असे सांगीतले. त्याचे सोबत असलेला याने २) मुश्ताक खान

बकर खान, वय २१ वर्षे, रा. पंजाबी लाईन, जरीपटका, नागपुर असे सांगितले. दोघांनाही नमुद गोवंशीय जनावरे बाबत कागदपत्रे मागीतली असता, कोणीतीही कागदपत्रे न देता उडवा–उडवीचे उत्तरे दिली. आरोपी हे गोवंशीय जनावरे यांना कत्तली करीता नेत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन ०७ गोवंशीय जनावरे व टाटा सुपर एक्स चारचाकी वाहन असा एकुण किंमती अंदाजे ३,१५,०००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नमुद जनावरे यांना गौशाला येथे दाखल करण्यात आले आहे.

यांप्रकरणी फिर्यादी पोउपनि निकेतन किल्लेदार यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सदर येथे सपोनि. नितीन विटोले यांनी आरोपींविरूध्द कलम ५(अ),५(ब),९,९(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम–१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ३,११(१) प्राणी क्रुरता अधिनियम–१९६०, सहकलम ३(५) भा.न्या.सं., सहकलम ११८,११९ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**